**Signature and Name of Invigilator**

1. (Signature) __________________________

   (Name) ____________________________

2. (Signature) __________________________

   (Name) ____________________________

OMR Sheet No. : ......................................

(To be filled by the Candidate)

Roll No. | | | | | | | |

(In figures as per admission card)

Roll No.______________________________

(In words)

**J 3 8 1 0**

**Test Booklet No.**

Time : **1 $^1/_4$** hours]

# PAPER-II
# MARATHI

[Maximum Marks : **100**

Number of Pages in this Booklet : **8**

Number of Questions in this Booklet : **50**

## Instructions for the Candidates

1. Write your roll number in the space provided on the top of this page.
2. This paper consists of fifty multiple-choice type of questions.
3. At the commencement of examination, the question booklet will be given to you. In the first 5 minutes, you are requested to open the booklet and compulsorily examine it as below :
   (i) To have access to the Question Booklet, tear off the paper seal on the edge of this cover page. Do not accept a booklet without sticker-seal and do not accept an open booklet.
   (ii) **Tally the number of pages and number of questions in the booklet with the information printed on the cover page. Faulty booklets due to pages/questions missing or duplicate or not in serial order or any other discrepancy should be got replaced immediately by a correct booklet from the invigilator within the period of 5 minutes. Afterwards, neither the Question Booklet will be replaced nor any extra time will be given.**
   (iii) After this verification is over, the Test Booklet Number should be entered in the OMR Sheet and the OMR Sheet Number should be entered on this Test Booklet.
4. Each item has four alternative responses marked (A), (B), (C) and (D). You have to darken the oval as indicated below on the correct response against each item.
   **Example :** (A) (B) ● (D)
   where (C) is the correct response.
5. Your responses to the items are to be indicated in the **Answer Sheet given inside the Paper I Booklet only.** If you mark at any place other than in the ovals in the Answer Sheet, it will not be evaluated.
6. Read instructions given inside carefully.
7. Rough Work is to be done in the end of this booklet.
8. If you write your name or put any mark on any part of the test booklet, except for the space allotted for the relevant entries, which may disclose your identity, you will render yourself liable to disqualification.
9. You have to return the test question booklet and OMR Answer sheet to the invigilators at the end of the examination compulsorily and must not carry it with you outside the Examination Hall.
10. **Use only Blue/Black Ball point pen.**
11. **Use of any calculator or log table etc., is prohibited.**
12. **There is no negative marks for incorrect answers.**

## परीक्षार्थियों के लिए निर्देश

1. पहले पृष्ठ के ऊपर नियत स्थान पर अपना रोल नम्बर लिखिए ।
2. इस प्रश्न-पत्र में पचास बहुविकल्पीय प्रश्न हैं ।
3. परीक्षा प्रारम्भ होने पर, प्रश्न-पुस्तिका आपको दे दी जायेगी । पहले पाँच मिनट आपको प्रश्न-पुस्तिका खोलने तथा उसकी निम्नलिखित जाँच के लिए दिये जायेंगे जिसकी जाँच आपको अवश्य करनी है :
   (i) प्रश्न-पुस्तिका खोलने के लिए उसके कवर पेज पर लगी कागज की सील को फाड़ लें । खुली हुई या बिना स्टीकर-सील की पुस्तिका स्वीकार न करें ।
   (ii) **कवर पृष्ठ पर छपे निर्देशानुसार प्रश्न-पुस्तिका के पृष्ठ तथा प्रश्नों की संख्या को अच्छी तरह चैक कर लें कि ये पूरे हैं । दोषपूर्ण पुस्तिका जिनमें पृष्ठ/प्रश्न कम हों या दुबारा आ गये हों या सीरियल में न हों अर्थात किसी भी प्रकार की त्रुटिपूर्ण पुस्तिका स्वीकार न करें तथा उसी समय उसे लौटाकर उसके स्थान पर दूसरी सही प्रश्न-पुस्तिका ले लें । इसके लिए आपको पाँच मिनट दिये जायेंगे । उसके बाद न तो आपकी प्रश्न-पुस्तिका वापस ली जायेगी और न ही आपको अतिरिक्त समय दिया जायेगा ।**
   (iii) इस जाँच के बाद प्रश्न-पुस्तिका की क्रम संख्या OMR पत्रक पर अंकित करें और OMR पत्रक की क्रम संख्या इस प्रश्न-पुस्तिका पर अंकित कर दें ।
4. प्रत्येक प्रश्न के लिए चार उत्तर विकल्प (A), (B), (C) तथा (D) दिये गये हैं । आपको सही उत्तर के दीर्घवृत्त को पेन से भरकर काला करना है जैसा कि नीचे दिखाया गया है ।
   **उदाहरण :** (A) (B) ● (D)
   जबकि (C) सही उत्तर है ।
5. प्रश्नों के उत्तर **केवल प्रश्न पत्र I के अन्दर दिये गये उत्तर-पत्रक पर ही** अंकित करने हैं । यदि आप उत्तर पत्रक पर दिये गये दीर्घवृत्त के अलावा किसी अन्य स्थान पर उत्तर चिह्नांकित करते हैं, तो उसका मूल्यांकन नहीं होगा ।
6. अन्दर दिये गये निर्देशों को ध्यानपूर्वक पढ़ें ।
7. कच्चा काम (Rough Work) इस पुस्तिका के अन्तिम पृष्ठ पर करें ।
8. यदि आप उत्तर-पुस्तिका पर अपना नाम या ऐसा कोई भी निशान जिससे आपकी पहचान हो सके, किसी भी भाग पर दर्शाते या अंकित करते हैं तो परीक्षा के लिये अयोग्य घोषित कर दिये जायेंगे ।
9. आपको परीक्षा समाप्त होने पर प्रश्न-पुस्तिका एवं OMR उत्तर-पत्रक निरीक्षक महोदय को लौटाना आवश्यक है और परीक्षा समाप्ति के बाद उसे अपने साथ परीक्षा भवन से बाहर न लेकर जायें ।
10. **केवल नीले/काले बाल प्वाईंट पैन का ही इस्तेमाल करें ।**
11. **किसी भी प्रकार का संगणक (कैलकुलेटर) या लाग टेबल आदि का प्रयोग वर्जित है ।**
12. **गलत उत्तरों के लिए कोई अंक काटे नहीं जाएँगे ।**

# MARATHI
# मराठी
## Paper – II
## प्रश्नपत्रिका – II

**Note :** This paper contains **fifty (50)** objective type questions, each question carrying **two (2)** marks. Attempt **all** the questions.

**टीप :** या प्रश्नपत्रिकेत विविध विकल्प असलेले **पन्नास (50)** प्रश्न आहेत. प्रत्येक प्रश्नास **दोन (2)** गुण आहेत. **सर्व** प्रश्न सोडवावयाचे आहेत.

**1.** विंध्याद्रीपासौनि दक्षिण दिशेसी । कृष्णानदीपासौनि उत्तरेसी । झाडी मंडळापासौनी पश्चिमेसी । महाराष्ट्र बोलिजे ।।
हे महाराष्ट्राचे वर्णन कोणी केले आहे ?

(A) चक्रधर स्वामी (B) डिंभकृष्णमुनी
(C) नरेंद्र (D) खळोबास

**2.** "महाराष्ट्र सात्त्विकः तेथचे जडचेतन पदार्थ तेही सात्त्विकः तेथं असतां कव्हणीचि शारीर मानसीक उपद्रव नुपजतिः"
हा गौरव कोणत्या ग्रंथात आला आहे ?

(A) लीळाचरित्र (B) स्मृतिस्थळ
(C) आचारस्थळ (D) विवेकसिंधू

**3.** "खलदेव मुर्ति । उभेमार्गि केसवदेवें श्री विठ्ठल संनिधि केला धर्मु पावे"
हा उल्लेख कोणत्या शिलालेखात आढळतो ?

(A) पंढरपूरचा विठ्ठलदेवाचा शिलालेख
(B) उन्हकदेव शिलालेख
(C) नेवासे शिलालेख
(D) खोलेश्वराचा आंबे शिलालेख

**4.** "पोट भराया उभारिला ना तमाशाचा धंदा", हे तडफदार उत्तर कोणाचे ?

(A) परशराम (B) प्रभाकर
(C) होनाजी बाळा (D) रामजोशी

**5.** "अवघा रंग एक झाला । रंगी रंगला श्रीरंग", हा अभंग कोणाचा ?

(A) मुक्ताबाई (B) जनाबाई
(C) सोयराबाई (D) निळोबा

**6.** बखरी व बखरकार यांच्या जोड्या जुळवा :

(a) मराठ्यांची बखर — (i) रघुनाथ यादव चित्रगुप्त
(b) पाणिपतची बखर — (ii) दत्ताजी त्रिमल वाकेनवीस
(c) एकयाण्णव कलमी बखर — (iii) ग्रँट डफ
(d) भाऊसाहेबांची कैफियत — (iv) त्रिंबक सदाशिव पुरंदरे

| | (a) | (b) | (c) | (d) |
|---|---|---|---|---|
| (A) | (ii) | (iii) | (i) | (iv) |
| (B) | (iii) | (i) | (ii) | (iv) |
| (C) | (iv) | (i) | (iii) | (ii) |
| (D) | (i) | (iii) | (iv) | (ii) |

**7.** सिद्धान्त व सिद्धान्त मांडणारे यांच्या जोड्या जुळवा :

| **सिद्धान्त** | **सिद्धान्त मांडणारे** |
|---|---|
| (a) अनेकार्थता | (i) आय.ए. रिचर्डस |
| (b) अनुकृती | (ii) एम्पसन |
| (c) कुलसाम्य | (iii) ॲरिस्टॉटल |
| (d) प्रेरणा संतुलन | (iv) विट्गिन्स्टाइन |

| | (a) | (b) | (c) | (d) |
|---|---|---|---|---|
| (A) | (ii) | (iv) | (i) | (iii) |
| (B) | (iv) | (i) | (iii) | (ii) |
| (C) | (i) | (iii) | (iv) | (ii) |
| (D) | (ii) | (iii) | (iv) | (i) |

**8.** ग्रंथ व ग्रंथकार यांच्या जोड्या जुळवा :

| | | | |
|---|---|---|---|
| (a) | काव्यप्रकाश | (i) | भामह |
| (b) | काव्यालंकार | (ii) | भरत |
| (c) | नाट्यशास्त्र | (iii) | अभिनव गुप्त |
| (d) | अभिनव भारती | (iv) | मम्मट |

| | (a) | (b) | (c) | (d) |
|---|---|---|---|---|
| (A) | (i) | (iv) | (iii) | (ii) |
| (B) | (iv) | (i) | (ii) | (iii) |
| (C) | (iii) | (i) | (ii) | (iv) |
| (D) | (iii) | (ii) | (i) | (iv) |

**9.** "रीतिरात्मा काव्यस्य । विशिष्टा पदरचना रीतिः । विशेषो गुणात्मा ।", ही वामनाने केलेली रीतीची व्याख्या असून "सौंदर्य ग्राह्यं अलंकारात् । सौंदर्य अलंकार:", असे त्यानेच म्हटले आहे.

(A) संपूर्ण विधान बरोबर आहे.
(B) पूर्वार्ध बरोबर, उत्तरार्ध चूक.
(C) पूर्वार्ध चूक, उत्तरार्ध बरोबर.
(D) संपूर्ण विधान चूक आहे.

**10.** स्थायीभावांची संख्या किती ?

(A) तेहतीस (B) दहा
(C) आठ (D) एकोणपन्नास

**11.** जयवंत दळवी हे कादंबरीकार होते तसेच नाटककारही होते.

(A) संपूर्ण विधान बरोबर
(B) पूर्वार्ध बरोबर, उत्तरार्ध चूक
(C) उत्तरार्ध बरोबर, पूर्वार्ध चूक
(D) संपूर्ण विधान चूक

**12.** 'आज मला मळमळते', या वाक्यातील प्रयोग कोणता ?

(A) भावकर्तरी (B) भावे
(C) कर्मभावसंकर (D) कर्मणी

**13.** ओहो, अबब, बापरे, अरेच्चा ही कोणत्या प्रकारची केवलप्रयोगी अव्यये आहेत ?

(A) हर्षदर्शक (B) प्रशंसादर्शक
(C) आश्चर्यदर्शक (D) संबोधन दर्शक

**14.** शेजारीपाजारी, बारीकसारीक, आडवातिडवा, गोडधोड या शब्दांना काय म्हणतात ?

(A) पूर्णाभ्यस्त शब्द
(B) अंशाभ्यस्त शब्द
(C) पुनरुक्त शब्द
(D) सामासिक शब्द

**15.** शब्द आणि समासाचा प्रकार यांच्या जोड्या लावा :

| | | | |
|---|---|---|---|
| (a) | महादेव | (i) | बहुव्रीही |
| (b) | यथाशक्ती | (ii) | तत्पुरुष |
| (c) | नीळकंठ | (iii) | अव्ययीभाव |
| (d) | चहापाणी | (iv) | समाहार द्वंद्व |

| | (a) | (b) | (c) | (d) |
|---|---|---|---|---|
| (A) | (iv), | (i), | (iii), | (ii) |
| (B) | (i), | (ii), | (iv), | (iii) |
| (C) | (ii), | (iii), | (i), | (iv) |
| (D) | (iii), | (i), | (ii), | (iv) |

**16.** सौंदर्यशास्त्रावर कोणी लेखन केले नाही ?

(A) प्रभाकर पाध्ये
(B) सुरेंद्र बारलिंगे
(C) शरच्चंद्र मुक्तिबोध
(D) गंगाधर गाडगीळ

**17.** पुढीलपैकी कोणत्या लेखकाला ज्ञानपीठ पुरस्कार मिळाला नाही ?

(A) वि.स. खांडेकर
(B) गो.वि. करंदीकर
(C) श्री.ना. पेंडसे
(D) वि.वा. शिरवाडकर

**18.** पुढील कादंबऱ्या कालक्रमानुसार लावा :
रागिणी, चंद्रप्रभाविरहवर्णन, ययाती, रणांगण

(A) चंद्रप्रभाविरहवर्णन, रागिणी, रणांगण, ययाती
(B) रागिणी, चंद्रप्रभाविरहवर्णन, रणांगण, ययाती
(C) चंद्रप्रभाविरहवर्णन, रणांगण, रागिणी, ययाती
(D) ययाती, चंद्रप्रभाविरहवर्णन, रणांगण, रागिणी

**19.** समीक्षा कार्याच्या कालक्रमानुसार समीक्षकांची नावे लिहा :

(i) रा.भा. पाटणकर

(ii) वा.म. जोशी

(iii) रा.श्री. जोग

(iv) श्रीधर व्यंकटेश केतकर

(A) (i) (iii) (iv) (ii)

(B) (ii) (iv) (iii) (i)

(C) (i) (iv) (iii) (ii)

(D) (i) (iii) (ii) (iv)

**20.** समीक्षाग्रंथ व समीक्षक यांच्या जोड्या जुळवा :

| | | | |
|---|---|---|---|
| (a) | टीका विवेक | (i) | आनंद पाटील |
| (b) | टीका आणि टीकाकार | (ii) | श्री.के. क्षीरसागर |
| (c) | टीका स्वयंवर | (iii) | वा.भा. पाठक |
| (d) | टीका वस्त्रहरण | (iv) | भालचंद्र नेमाडे |

| | (a) | (b) | (c) | (d) |
|---|---|---|---|---|
| (A) | (ii) | (iii) | (iv) | (i) |
| (B) | (i) | (ii) | (iii) | (iv) |
| (C) | (i) | (iii) | (ii) | (iv) |
| (D) | (i) | (iv) | (iii) | (ii) |

**21.** विघटन न होऊ शकणारी, लहानात लहान अर्थवाहक रचना म्हणजे काय ?

(A) स्वनिम

(B) रूपिका

(C) शून्य रूपिकांतर

(D) धातू

**22.** पृष्ठस्तरीय व अंत:स्तरीय अशी वाक्याची द्विस्तरीय रचना कोणी सुचविली आहे ?

(A) चॉम्स्की

(B) विट्गन्स्टाईन

(C) ब्लूमफिल्ड

(D) सोस्यूर

**23.** पूरक विनियोग, स्वैर विनियोग व वैधर्म्ययुक्त विनियोग ही तत्त्वे कशाची निश्चिती करतात ?

(A) विशेषण (B) स्वनिम

(C) रूपिम (D) पदांतर

**24.** बंगालीमधून कोणती साहित्यकृती मराठीत अनुवादित झाली नाही.

(A) गोरा (B) आनंदमठ

(C) श्रीकांत (D) संस्कार

**25.** पुढीलपैकी कोणत्या नाटककाराची सर्वाधिक नाटके मराठीत अनुवादित झालेली आहेत.

(A) गिरीश कर्नाड

(B) मोहन राकेश

(C) बादल सरकार

(D) रवींद्र ठाकूर

**26.** पुढीलपैकी कोणत्या साहित्यकृती कन्नडमधून अनुवादित झालेल्या आहेत ?

(a) पर्व (b) कार्व्हालो

(c) पॅरालिसिस (d) जयकेतू

(A) वरील पैकी सर्व.

(B) वरील पैकी एकही नाही.

(C) वरील पैकी (a) आणि (b)

(D) वरील पैकी (c) आणि (d)

**27.** 'सवाई माधवराव यांचा मृत्यू' या नाटकात खाडिलकरांनी 'हॅम्लेट' व 'ऑथेल्लो' या दोन नाटकांतील व्यक्तिरेखांचा संयोग घडवून आणला आहे. वसंत कानेटकर यांनीही शेक्सपियरच्या व्यक्तिरेखा आपल्या नाटकात योजिल्या आहेत.

(A) पूर्वार्ध चूक उत्तरार्ध बरोबर

(B) पूर्ण विधान बरोबर

(C) पूर्वार्ध बरोबर उत्तरार्ध चूक

(D) पूर्ण विधान चूक

**28.** पुढीलपैकी कोणता शब्द शुद्धलेखनाच्या नियमानुसार लिहिलेला आहे ?

(A) वीकारविलसीत

(B) विकारविलसित

(C) विकारवीलसित

(D) विकारविलसीत

**29.** प्रकाशकाची मुलाखत घेताना कोणते प्रश्न विचाराल ?

(A) प्रकाशक म्हणून मिळालेले यश

(B) लेखक-प्रकाशक संबंध

(C) प्रकाशन व्यवसायातील वाढती महागाई

(D) प्रकाशक म्हणून आलेले विविध अनुभव

**30.** अग्रलेखात कोणत्या घटकाला महत्त्व असावे ?

(A) लोकजागृती

(B) आलंकारिक भाषा

(C) मनोरंजन

(D) राजकारण

**31.** 'काडतूस', 'कूपन', 'फिरंगी' हे शब्द कोणत्या भाषेतून आलेले आहेत ?

(A) पोर्तुगीज (B) इंग्लिश

(C) फ्रेंच (D) अरबी

**32.** 'कायदा', 'बंदिश', 'सरकार', 'मैफल' हे शब्द कोणत्या भाषेतील आहेत ?

(A) उर्दू (B) अरबी

(C) तमिळ (D) फार्सी

**33.** अमानत > अनामत, मशहूर > महशूर ही कसली उदाहरणे आहेत ?

(A) वर्णविपर्यय (B) द्वित्वलोप

(C) स्वरागम (D) अर्थादेश

**पुढील उतारा वाचून त्याखालील प्रश्नांची उत्तरे उताऱ्याच्या आधारे लिहा : (प्र.क्र. 34 – 38)**

निसर्गाइतकेच मला वाङ्मयाचे वेड आहे. जीवनाच्या आनंदामधून ते निर्माण झाले आहे. वाङ्मयापेक्षा मला अधिक प्रिय काही नाही. वाङ्मय म्हणजे जीवनातला मधु. जीवनात सर्वत्र मधु भरलेला आहे. विषही आहे. पण मधमाशांप्रमाणे वाङ्मयकार उत्तम मधूच गोळा करतात. वाङ्मय म्हणजे मधाचे पोळे. कोळयाचे जाळे नव्हे. मधाच्या पोळयापेक्षा कोळयाचे जाळे दिसते सुंदर. त्याचे धागे किती नाजुक. रचना किती कलात्मक. पण माश्यांना मारण्याचा तो फास आहे, दुसरे काय ? त्या जाळयात अडकणे म्हणजे मरण. मधाच्या पोळयात कला नसते असे नाही. त्याच्या रचनते केवढे कौशल्य असते ? पण पोळयातल्या कलेला महत्त्व नाही. मधाला महत्त्व. मध म्हणजे जीवन. जो तो पितो, तो जिवंत होतो. वाङ्मयात शब्दांना महत्त्व नाही. कलेला नाही. तंत्राला नाही. त्यात मधू आहे की नाही, हा प्रश्न महत्त्वाचा आहे. भांड्याला किंमत नाही. त्यात काय भरले आहे हयाला किंमत आहे. विनोबा म्हणतात, 'ज्याने चित्ताची शुद्धी होते, ते वाङ्मय.' वाङ्मयाने जीवनात माधुरी उत्पन्न झाली पाहिजे, हर्ष निर्माण केला पाहिजे, नवीन दृष्टी दिली पाहिजे. ज्ञानेश्वर, तुकाराम, विनोबा किंवा साने गुरूजी ह्यांचे वाङ्मय म्हणजे मधाची पोळी. त्यातला मधू प्यावा नि अमर व्हावे. पुष्कळसे लेखक घरातच बसतात. पुस्तके वाचतात आणि जाळी विणतात. पण हे त्यांचे लेखन क्षणजीवी असते. त्यात सत्य नसते. जीवनाचा शोध नसतो. वाङ्मयकारांनी जीवनाकडे जायला पाहिजे. जीवनाचे संशोधन केले पाहिजे. सेवेच्या कोणत्या ना कोणत्या तरी क्षेत्रामध्ये उडी घेतली पाहिजे. साहित्यात जीवनाचा साक्षात्कार घडावयाला पाहिजे. जीवनाचा अनुभव असल्याखेरीज हे कसे होईल ?

**34.** लेखकाला निसर्गाइतकेच आणखी कशाचे वेड आहे ?

(A) जीवनाचे

(B) आनंदाचे

(C) वाङ्मयाचे

(D) मधाचे

**35.** लेखकाने वाङ्मयाला कशाची उपमा दिली आहे ?

(A) कोळ्याच्या जाळयाची

(B) मधाच्या पोळयाची

(C) धाग्यांची

(D) फासाची

**36.** कोळयाच्या जाळयातील वाईट भाग कोणता ?

(A) त्यातील धाग्यांचा नाजुकपणा

(B) त्याचे सुंदर दिसणे

(C) त्याचा फास

(D) त्यातील कोळी

**37.** वाङ्मयात कशाला महत्त्व असते ?

(A) शब्दांना

(B) कलेला

(C) तंत्राला

(D) 'मधु'ला

**38.** वाङ्मयाने जीवनात काय निर्माण करू नये ?

(A) माधुरी

(B) द्वेष

(C) हर्ष

(D) नवीन दृष्टी

**39.** "मार्गा धारें वर्तावें । विश्व हे मोहरे लावावें ।
अलौकिकां नोहावे । लोकांप्रति ।।"
ही ओवी खालील पैकी कोणत्या कवीची आहे ?

(A) रामदास

(B) ज्ञानेश्वर

(C) नामदेव

(D) एकनाथ

**40.** रामायणाची वेगवेगळ्या प्रकारांनी १०८ वेळा रचना कोणत्या कवीने केली ?

(A) श्रीधर

(B) मोरोपंत

(C) रघुनाथ पंडित

(D) रामदास

**41.** खालील कवी आणि त्यांची टोपणनावे यांच्या जोड्या लावा :

| | | | |
|---|---|---|---|
| (a) | कृष्णाजी केशव दामले | (i) | बी |
| (b) | नारायण मुरलीधर गुप्ते | (ii) | अनिल |
| (c) | आत्माराम रावजी देशपांडे | (iii) | केशवसुत |
| (d) | त्र्यंबक बापूजी ठोंबरे | (iv) | बालकवी |

| | (a) | (b) | (c) | (d) |
|---|---|---|---|---|
| (A) | (iii) | (i) | (ii) | (iv) |
| (B) | (ii) | (iii) | (iv) | (i) |
| (C) | (iv) | (ii) | (i) | (iii) |
| (D) | (i) | (iii) | (iv) | (ii) |

**42.** 'हास्यविनोद मीमांसा' या ग्रंथाचे लेखक कोण ?

(A) प्र.के. अत्रे

(B) गो.मा. पवार

(C) श्री.कृ. कोल्हटकर

(D) न.चिं. केळकर

**43.** 'प्रेमाचे शाहीर' हे बिरूद कोणत्या कवीला दिले गेले ?

(A) माधव जूलियन

(B) पु.शि. रेगे

(C) गोविंदाग्रज

(D) भा.रा. तांबे

**44.** खालील कवितासंग्रह आणि कवी यांच्या जोड्या लावा :

| | | | |
|---|---|---|---|
| (a) | चांदरात | (i) | बा.भ. बोरकर |
| (b) | सांजवात | (ii) | बा.सी. मर्ढेकर |
| (c) | जीवनसंगीत | (iii) | अनिल |
| (d) | शिशिरागम | (iv) | अनंत काणेकर |

| | (a) | (b) | (c) | (d) |
|---|---|---|---|---|
| (A) | (iv) | (iii) | (i) | (ii) |
| (B) | (i) | (iv) | (ii) | (iii) |
| (C) | (ii) | (i) | (iii) | (iv) |
| (D) | (iv) | (iii) | (ii) | (i) |

**45.** पुढीलपैकी कोणते कवी 'रामदास पंचायतन' म्हणून गणले जातात ?

(a) जयरामस्वामी वडगावकर

(b) कल्याणस्वामी

(c) रंगनाथस्वामी निगडीकर

(d) केशवस्वामी भागानगरकर

(e) रामदास

(f) आनंदमूर्ती ब्रह्मनाळकर

(g) दिवाकरस्वामी गोसावी

(A) a, b, c, d, e (B) a, c, d, e, f

(C) a, d, e, f, g (D) b, c, d, f, g

**46.** पुढीलपैकी कोणते काव्यसंग्रह नामदेव ढसाळ यांचे नाहीत ?

(a) उत्थान गुंफा

(b) गोलपिठा

(c) या सत्तेत जीव रमत नाही

(d) कोंडवाडा

(A) वरील पैकी (a) आणि (d)

(B) वरील पैकी (b) आणि (c)

(C) वरील पैकी (a) आणि (c)

(D) वरील पैकी (b) आणि (d)

**47.** खालील पाश्चात्य नाट्यकृती आणि त्यांची मराठी रूपांतरे यांच्या जोड्या लावा :

| | | | |
|---|---|---|---|
| (a) | कॉकेशियन सर्कल | (i) | अजब न्याय वर्तुळाचा |
| (b) | मॅकबेथ | (ii) | तीन पैशाचा तमाशा |
| (c) | थ्री पेन्नी ऑपेरा | (iii) | ती फुलराणी |
| (d) | पिग्मॅलियन | (iv) | राजमुकुट |

| | (a) | (b) | (c) | (d) |
|---|---|---|---|---|
| (A) | (i) | (iv) | (ii) | (iii) |
| (B) | (ii) | (iii) | (iv) | (i) |
| (C) | (i) | (ii) | (iii) | (iv) |
| (D) | (ii) | (iv) | (i) | (iii) |

**48.** पुस्तकाच्या जाहिरातीतील सर्वांत महत्त्वाचा घटक कोणता ?

(A) प्रकाशक

(B) पुस्तकाचे मूल्य

(C) लेखकाचे नाव व पुस्तकाचा विषय

(D) पृष्ठ संख्या

**49.** रा.ग. गडकरी, प्र.के. अत्रे आणि मो.ग. रांगणेकर ह्या मराठी नाटककारांच्या तिन्ही पिढ्यांशी समकालीन असणारे नाटककार कोण ?

(A) भा.वि. वरेरकर

(B) मा.ना. जोशी

(C) गो.ब. देवल

(D) विश्राम बेडेकर

**50.** "हेंचि दान देगा देवा । तुझा विसर न व्हावा ।।", हे मागणे कोणी मागितले आहे ?

(A) एकनाथ (B) जनाबाई

(C) नामदेव (D) तुकाराम

**Space For Rough Work**